**ई-फायलींग**

MHAU080035022025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ८४८/२०२५ मध्ये निशाणी क्र.१ वरील आदेश**

*(ज्ञानेश्वर व इतर वि. महाराष्ट्र शासन)*

अर्जदार यांनी सदरचा अर्ज महाराष्ट्र रेग्युलेशन कायदा, १८२७, खंड ८ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**२.** अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, मयत नामे लक्ष्मण तुळशीराम गव्हाणे यांचे दि. ०२/०९/२०२४ रोजी मौजे गोळेगाव बु., ता. सिल्लोड येथे निधन झालेले आहे. मयत लक्ष्मण तुळशीराम गव्हाणे यांची पत्नी नामे कस्तुराबाई लक्ष्मण गव्हाणे या दि. १४/१२/२०२२ रोजी मरण पावलेल्या आहेत. तसेच त्यांची आई नामे साखराबाई तुळशीराम गव्हाणे यांचे देखील यापूर्वीच निधन झालेले आहे. मयत लक्ष्मण तुळशीराम गव्हाणे यांची दोन मुले नामे दादाराव लक्ष्मण गव्हाणे हे दि. ०५/०४/२००५ रोजी तर ईश्वर लक्ष्मण गव्हाणे हे दि. १२/०४/२०१३ रोजी मयत झालेली आहेत. मयत दादाराव यांचे अर्जदार क्र. ३.१ ते ३.४ हे वारस असुन मयत ईश्वर यांचे अर्जदार क्र. ४.१ ते ४.४ हे वारस आहेत.

**३.** मयत लक्ष्मण तुळशीराम गव्हाणे यांचा अर्जदार क्र. १ हा मुलगा, अर्जदार क्र. २ ही मुलगी, अर्जदार क्र. ३.१ ही सुन, अर्जदार क्र. ३.२ ते ३.४ हे नातु, अर्जदार क्र. ४.१ ही सुन आणि अर्जदार क्र. ४.२ ते ४.४ हे नातु व नातीन आहेत. अर्जदारांव्यतिरीक्त मयत लक्ष्मण तुळशीराम गव्हाणे यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

**४.** अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व महसुल कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने प्रस्तूत अर्ज दाखल करुन तो मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**५.** प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार यांचेवर नि.क्र. १४ खाली नोटीसची बजावणी होऊन देखील त्यांचे तर्फे कोणीही हजर झाले नाही. तरी देखील प्रस्तूत प्रकरणाची जनतेस माहिती व्हावी करीता दि. १४/०१/२०२६ रोजीची जाहीर नोटीस गोळेगाव बु. येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या फलकावर नि.क्र. ०८ खालील बेलिफ रिपोर्ट प्रमाणे प्रसिध्द करण्यात आली. तसेच सदर जाहीर नोटीस अर्जदार यांनी दैनिक

वर्तमानपत्र "लोकपत्र" दि. १०/०१/२०२६ रोजीच्या अंकात प्रसिध्द केली असता कोणताही आक्षेप आजपावेतो आलेला नाही.

६. करीता, पुढील प्रश्न माझ्या विचारार्थ येतात, त्यावर मी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ. क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र. १ करीता** –

७. अर्ज व त्यातील कथने शाबीत करण्यासाठी अर्जदारांनी अर्जदार क्र. १, २ व ४.१ यांना अनुक्रमे नि.क्र. ०९ ते ११ वर तपासले. ज्या मजकुराचा अर्जात उल्लेख आहे, तसा मजकूर अर्जदार यांनी त्यांच्या पुराव्यात पुन्हा कथन केलेला आहे. अर्जदार यांनी अर्जाच्या कथनाच्या पुष्ठ्यर्थ मयत लक्ष्मण तुळशीराम गव्हाणे यांचे मृत्यू दाखल्याची प्रत, मयत कस्तुराबाई लक्ष्मण गव्हाणे यांचे मृत्यू दाखल्याची प्रत, मयत दादाराव लक्ष्मण गव्हाणे यांचे मृत्यू दाखल्याची प्रत, मयत ईश्वर लक्ष्मण गव्हाणे यांचे मृत्यू दाखल्याची प्रत, अर्जदारांच्या आधारकार्डच्या छायांकीत प्रती, दिनांक १०/०१/२०२६ रोजीचे न्यायालयाचे जाहीर प्रगटन प्रसिध्द केलेल्या दैनिक "लोकपत्र" च्या आवृत्तीची प्रत इ. दस्त (नि.क्र. ४ व ६) खाली दाखल केले आहेत. तसेच नि.क्र. ०८ खाली बेलिफ यांचा प्रसिध्दी अहवाल दाखल केलेला आहे.

८. अर्जदार यांच्यातर्फे देण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा एकमेकास पुरक असून तो अबाधित आहे. तसेच त्यांनी प्रस्तुत अर्जाच्या कथनाच्या पुष्ठ्यर्थ जाहीर प्रगटन (नि.क्र. ०७) दिल्यानंतर त्याबाबत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. वरील चर्चेवरुन मयत लक्ष्मण तुळशीराम गव्हाणे यांचे अर्जदार क्र. १ ते ४.४ हे वारस आहेत असा निष्कर्ष काढण्यात येत आहे. अशा परिस्थितीत सदर वारस प्रमाणपत्र अर्जदार यांचे नावे देणे उचित होईल. सबब, प्रश्न क्र.१ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवितो.

**प्रश्न क्र. २ करीता** –

९. अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत असा निष्कर्ष मी, वर उल्लेख केल्याप्रमाणे नोंदविलेला आहे.

१०. भारतीय वारसा कायदा, १९२५ चे कलम ३९० अन्वये बॉम्बे रेग्युलेशन कायदा अंतर्गत देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रास भारतीय वारसा कायदा, १९२५ चे कलम

३९० लागू असून त्या अन्वये कोर्ट फी कायदा अन्वये योग्य तो मुद्रांक लावणे आवश्यक असल्याबाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे बॉम्बे रेग्युलेशन अन्वये देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रास देखील महाराष्ट्र कोर्ट फी कायदा लागू असल्याने अर्जदार क्र. १ ते ४.४ हे महाराष्ट्र कोर्ट फी कायद्याचे परिशिष्ट क्र.१ चे आर्टीकल १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आर्टीकल १० व ११ अन्वये न्यायालयीन मुद्रांक भरणे आवश्यक व जरुरीचे आहे. परिणामतः हा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी प्रश्न क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार क्र. १ ते ४.४ यांना बॉम्बे रेग्युलेशन तरतुदींचे अपेंडीक्स 'ब' प्रमाणे **मयत लक्ष्मण तुळशीराम गव्हाणे** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दाखला **केवळ अर्जात नमूद कारणांसाठी** देण्यात यावा.

३. वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता अर्जदार यांनी योग्य ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क न्यायालयात जमा करावे.

Digitally signed by KAILAS TRYAMBAK ADHAYKE
Date: 2026.05.05 16:29:51 +0530

सिल्लोड. (के. टी. अढायके)
दिनांक – ०५/०५/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सिल्लोड.